सर्वोच्च न्यायालय रिपोर्ट [२०१९] ४ एस. सी. आर. पृष्ठ क्र. ८६३-८६७

(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

2019-4-SCR-863

ज्ञानेश्वर सुरेश बोरकर

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य

(फौजदारी अपील क्रमांक १४११/२०१८)

२० फेब्रुवारी २०१९

[न्यायमूर्ती ए. के. सिक्री. एस. अब्दुल नझीर आणि न्यायमूर्ती एम. आर. शाह]

शिक्षादेश / शिक्षा : मृत्युदंड-अज्ञान मुलाची हत्या केल्याबद्दल-अधिनिर्णित - केलेला गुन्हा क्रूर होता, परंतु आरोपी पूर्वीचा सिद्धापराधी किंवा व्यावसायिक मारेकरी नसल्यामुळे त्याला मृत्युदंड देण्यात आला नाही-गुन्हा करताना तो २२ वर्षांचा होता-त्याचे तुरुंगातील वर्तन देखील चांगले असल्याचे कळवण्यात आले होते- शामक परिस्थिती अपीलकर्त्याच्या बाजूने असल्याने, न्यायाच्या हितासाठी, मृत्युदंडाचे रूपांतरण जन्मठेपेत केले जाते.

अपीलास अंशतः मान्य देत, न्यायालयाने असे अधिनिर्णित केले की : बिकट आणि शामक परिस्थितींमधील समतोल साधत, मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत रूपांतरित करताना शामक परिस्थिती आरोपीच्या बाजूने आहे. गुन्ह्याच्या वेळी आरोपीचे वय २२ वर्षे होते; हे की, आतापर्यंत त्याने तुरुंगात १८ वर्षे घालवली आहेत; हे की, तुरुंगात

असताना त्याचे वर्तन चांगले होते; म्हणजे, आरोपीने सुसंस्कृत माणूस बनण्याचा प्रयत्न केला आणि तुरुंगातून बी. ए. मध्ये पदवी प्राप्त केली. त्याने सुधारणावादी होण्याचा प्रयत्न केला आहे; हे की, तुरुंगात त्याने लिहिलेल्या कवितांवरून असे दिसून आले की त्याला त्याची चूक कळली होती जी त्याच्या तरुणपणी त्याच्याकडून झाली होती आणि म्हणूनच त्याचे सुधारणा आणि पुनर्वसन केले जाऊ शकते. आरोपी अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्य करणार नाही अशी शक्यता या तपशीलांवरून दिसून येते. हे की, आरोपी समाजाला सतत धोका ठरणार नाही.खटल्यातील तथ्ये आणि परिस्थिती पाहता, मृत्युदंडाच्या शिक्षेचा निर्णय योग्य नाही. [परिच्छेद ६.१, ७] [८६६-सी-एच]

सुनील विरुद्ध मध्य प्रदेश राज्य **(२०१७) ४ *एससीसी* ३९३;**

बचन सिंग विरुद्ध पंजाब राज्य **(१९८०) २ *एससीसी* ६८४;** *श्याम सिंग उर्फ भीमा विरुद्ध मध्य प्रदेश राज्य* **(२०१७) ११ *एससीसी* २६५ -**

यावर भर देण्यात आला.

निर्णयविधि संदर्भ

(२०१७) ४ एससीसी ३९३;	**भर दिला**	**परिच्छेद ४**
(१९८०) २ एस.सी.सी . ६८४	**भर दिला**	**परिच्छेद ८**
(२०१७) ११ एस. सी. सी. २६५	**भर दिला**	**परिच्छेद ८**

फौजदारी अपिलीय न्यायाधिकारक्षेत्र: फौजदारी अपील क्रमांक १४११/२०१८

फौजदारी अपील क्रमांक ६१८/२००५ सह पुष्टी प्रकरण (कन्फर्मेशन केस) क्रमांक १/२००५ मधील बॉम्बे उच्च न्यायालयाच्या दिनांक ०५.०५.२००६ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी वरिष्ठ वकील आनंद ग्रोवर, हिमांशू अग्रवाल, शादान फरासत, कु. जान्हवी सिंधू, कु.श्रुती नारायण, अंशु राज सिंग, आणि कु. तृप्ती टंडन.

उत्तरार्थींसाठी दीपा कुलकर्णी, निशांत रमाकांतराव काटनेश्वरकर .

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ती एम. आर. शाह यांनी दिला.

१. फौजदारी अपील क्रमांक ६१८/२००५ सह पुष्टी प्रकरण (कन्फर्मेशन केस) क्रमांक १/ २००५ मधील बॉम्बे उच्च न्यायालयाने दिनांक ०५.०५.२००६ रोजी पारित केलेला आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश ज्यामध्ये उच्च न्यायालयाने राज्याने दाखल केलेला पुष्टी प्रकरण (कन्फर्मेशन केस)मंजूर केला आहे आणि अपीलकर्त्याचे फौजदारी अपील फेटाळले आहे आणि भारतीय दंड संहितेच्या (आय. पी. सी.) कलम ३०२ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांसाठी दोषसिद्धी कायम ठेवली आणि विद्वान सत्र न्यायालयाने सुनावलेल्या मृत्युदंडाची शिक्षा कायम ठेवली त्यामुळे व्यथित आणि

असमाधानी होऊन आरोपी नामे ज्ञानेश्वर सुरेश बोरकर याने प्रस्तुत अपील दाखल केले आहे.

२. 'ऋषिकेश' या अज्ञान मुलाची हत्या केल्याबद्दल भा. दं. वि. च्या कलम ३४ सहित कलम ३०२, ३६४ आणि कलम २०१ अंतर्गत केलेल्या गुन्ह्यांसाठी अपीलकर्त्यावर येथे-मूळ आरोपीवर विद्वान सत्र न्यायालयाने खटला चालवला होता.अपर सत्र न्यायाधीश, पुणे यांनी यांनी अपीलकर्त्याला भा. दं. वि. च्या कलम ३४ सहित कलम ३०२, ३६४ आणि कलम २०१ अंतर्गत शिक्षेस पात्र गुन्ह्यांसाठी दोषी ठरवून मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. विद्वान अपर सत्र न्यायाधीशांनी ठोठावलेल्या दोषसिद्धी आणि शिक्षेला उच्च न्यायालयाने आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे पुष्टी दिली आहे. करिता प्रस्तुत अपील .

३. सुरुवातीला, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, अपीलकर्त्याच्या वतीने हजर असलेले विद्वान वरिष्ठ वकील आनंद ग्रोवर यांनी न्याय्य रीतीने मांडले आणि कबूल केले आहे की, जोपर्यंत दोषसिद्धीचा संबंध आहे, अपीलकर्ता त्यास आव्हान देत नाही. तथापि, उच्च न्यायालयाने पुष्टी केलेल्या, सत्र न्यायालयाने सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षा कमी करण्याची विनंती त्याने केली आहे. त्यामुळे, प्रस्तुत अपील आता उच्च न्यायालयाने पुष्टी केलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेच्या विद्वान अपर सत्र न्यायाधीशांनी ठोठावलेल्या शिक्षेपुरतेच मर्यादित आहे.

४. श्री. ग्रोवर यांनी देहदंडाची शिक्षा जन्मठेपेत बदलण्याची शामक परिस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. गुन्ह्याच्या वेळी आरोपीचे वय २२-२३ वर्षे होते, असे जोरदारपणे सादर केले. त्याचा कोणतीही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही किंवा तो निबर गुन्हेगार नव्हता. तो महाविद्यालयात शिकणारा विद्यार्थी होता, ज्याचा महाविद्यालयात किंवा त्याच्या राहत्या गावी कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी किंवा किरकोळ गुन्हा नोंदवलेला नव्हता. हे की, त्याला विधवा आई आहे आणि तो सर्वात मोठा मुलगा आहे. आत्तापर्यंत त्याने १८ वर्षांची शिक्षा विनामाफी भोगली असून माफी मिळाल्यास ती २३ $^{१/२}$ वर्षे होईल. असे सादर करण्यात आले आहे की, कारागृहातील आरोपींचे वर्तन अतिशय चांगले आहे. असे सादर करण्यात आले आहे की, अपीलकर्त्याच्या तुरुंगातील वर्तन आणि वागणूकीतुन असे दिसून आले आहे की, जरी अपीलकर्त्याने तो तरुण वयात असताना गुन्हा केला असला तरी, त्याने त्याच्या कारावासाचा उपयोग त्याच्या कृत्यांवर चिंतन करण्यासाठी आणि त्याच्या चुकांमधून शिकण्यासाठी केला आहे. १८ वर्षांचा मुलगा म्हणून , तो एक तरुण, संस्कारक्षम नागरिक होता जो स्वतःहून काहीतरी घडवण्याचा प्रयत्न करत होता आणि या प्रक्रियेत तो मार्गभ्रष्ट झाला व त्याने एक जीवघेणी चूक केली." तथापि, अपीलकर्त्याने कारागृहात घालवलेल्या वर्षांमध्ये असे दिसून आले आहे की, तो अजिबात निबर अपराधी नाही आणि सुधारण्याच्या मर्यादेबाहेर नक्कीच नाही. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, १८ वर्षांच्या तुरुंगवासात त्याला केवळ धडा मिळाला नाही तर त्याने केलेली चूक त्याला कळली आहे आणि

त्याने एक सुसंस्कृत व्यक्ती बनण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याने कला शाखेत पदवी (बी.ए.) पूर्ण केली आहे आणि गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव द्वारे गांधीवादी विचारांचे प्रशिक्षण देखील घेतले आहे. पुढे असे सादर करण्यात आले आहे की , तुरुंगात आरोपीने लिहिलेल्या कवितांमध्ये त्याची सध्याची मानसिक स्थिती प्रतिबिंबित होते आणि ज्याद्वारे असे म्हटले जाऊ शकते की वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी त्याने केलेली चूक त्याच्या लक्षात आली आहे आणि तो सुधारणावादी आहे. वरील युक्तिवाद लक्षात घेता आणि *सुनील विरुद्ध मध्य प्रदेश राज्य* (२०१७) ४ *एससीसी* ३९३ या खटल्यातील या न्यायालयाच्या निर्णयावर भर देत मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत बदलण्याची विनंती केली जाते.

५. राज्य सरकारतर्फे उपस्थित असलेल्या विद्वान वकिल कु. दीपा कुलकर्णी यांनी असे म्हटले आहे की, आरोपीने खंडणीसाठी एका अज्ञान मुलाची हत्या केली, ज्याचा परिणाम शेवटी मयताच्या कुटुंबीयांवर झाला आहे आणि ज्या पद्धतीने गुन्हा करण्यात आला तो पूर्वनियोजित होता, त्यामुळे कोणतीही सौम्यता दाखवू नये अशी प्रार्थना आहे.

६. आम्ही संबंधित पक्षांच्या वतीने उपस्थित असलेल्या वकीलांचे म्हणणे ऐकले आहे आणि अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलाने देहांत शिक्षा जन्मठेपेमध्ये परिवर्तित करण्याची विनंती केली आहे.

६.१ पक्षकारांच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकीलांचे शिक्षेबाबत युक्तिवाद ऐकल्यानंतर, आमचे असे मत आहे की, या खटल्याची तथ्ये आणि परिस्थितीनुसार मृत्युदंड योग्य ठरत नाही. बिकट आणि शामक परिस्थितींमधील समतोल साधताना, आम्हाला असे वाटते की, मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत रूपांतरित करताना शामक परिस्थिती आरोपीच्या बाजूने आहे. आरोपीच्या बाजूने शामक परिस्थिती अशी आहे की:

क. गुन्ह्याच्या वेळी आरोपीचे वय २२ वर्षे होते;

ख. हे की, आतापर्यंत त्याने तुरुंगात १८ वर्षे घालवली आहेत;

ग. हे की, तुरुंगात असताना त्याचे वर्तन चांगले होते;

घ. हे की, आरोपीने समाजात सामील होण्याचा प्रयत्न केला आहे आणि सुसंस्कृत माणूस बनण्याचा प्रयत्न केला आणि तुरुंगातून बी. ए. मध्ये पदवी प्राप्त केली.त्याने सुधारणावादी होण्याचा प्रयत्न केला आहे;

ङ हे की, तुरुंगात त्याने लिहिलेल्या कवितांवरून असे दिसून आले की त्याला त्याची चूक कळली होती जी त्याच्या तरुणपणी त्याच्याकडून झाली होती आणि तो सुधारक आहे.

च. त्यामुळे अपीलकर्त्याची सुधारणा आणि पुनर्वसन केले जाऊ शकते.

७. वरील तपशीलांवरून असे दिसून येते की आरोपीने अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांची पुनरावृत्ती केली जाण्याची शक्यता नाही. हे की, आरोपी समाजासाठी सततचा धोका ठरणार नाही. या खटल्यातील उपरोक्त तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेऊन आणि या न्यायालयाने सुनिल (वर नमूद केलेल्या) याच्या प्रकरणात घालून दिलेला कायदा लागू केल्यास या खटल्यातील तथ्ये व परिस्थिती पाहता मृत्युदंडाच्या शिक्षेचा निर्णय घेणे योग्य नाही, असे आमचे मत आहे. आम्ही प्रत्येक परिस्थिती, गुन्हा तसेच आरोपीने केलेल्या गुन्ह्यापर्यंत पोहोचविणाऱ्या तथ्यांचा विचार केला आहे.जरी, आम्ही गुन्ह्याचे गांभीर्य मान्य करत असलो, तरी हे प्रकरण 'दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरण' या श्रेणीत येईल, ज्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा निश्चित केली जाईल, याबद्दल आम्ही स्वतःला संतुष्ट करू शकत नाही.केलेला गुन्हा निःसंशयपणे क्रूर म्हणता येईल, परंतु तो मृत्युदंडाची आवश्यकता दर्शवत नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, आरोपी पूर्वीचा सिद्धापराधी किंवा व्यावसायिक मारेकरी नव्हता. गुन्हा करताना तो २२ वर्षांचा होता. त्याचे तुरुंगातील वर्तनही चांगले असल्याचे कळविण्यात आले आहे.

८. वरील शामक परिस्थिती लक्षात घेऊन आणि *बचन सिंग विरुद्ध पंजाब राज्य* (१९८०) २ *एस. सी. सी.* ६८४ मधील या न्यायालयाचा निर्णय तसेच *श्यामसिंग उर्फ*

भीमा विरुद्ध मध्य प्रदेश राज्य (२०१७) ११ *एस. सी. सी.* २६५ मधील या न्यायालयाचा आणखी एक निर्णय आणि सुनील (उपरोक्त) मधील या न्यायालयाचा निर्णय विचारात घेतल्यास, आम्हाला असे वाटते की मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत रूपांतरित करणे न्यायाच्या हिताचे ठरेल .

९. वर नमूद केलेली कारणे लक्षात घेता, प्रस्तूत अपील अंशतः मान्य केले जाते. भारतीय दंड संहितेच्या कलम ३४ सहित कलम ३०२, ३६४ आणि कलम २०१ अंतर्गत गुन्ह्यांसाठी आरोपींच्या शिक्षेची पुष्टी केली जाते. तथापि, प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थिती पाहता आणि वर नमूद केलेली कारणे लक्षात घेऊन आम्ही मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत रूपांतरित करतो. आरोपीला राज्य सरकारकडे माफीसाठी अर्ज करणे खुले असेल, ज्याचा कायद्यानुसार आणि गुणवत्तेनुसार विचार केला जाईल. प्रस्तूत अपील वरील अटींनुसार निकाली काढण्यात येत आहे .

अपीलाला अंशतः परवानगी देण्यात येत आहे.

देविका गुजराल

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."